ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 7 | ISSUE - 11 | JULY - 2021

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# 'यशवंतराव होळकरांची दक्षिणस्वारी व चांदवड'



डॉ. गुंजन गरुड
(Post Doctoral Fellow)
इतिहास विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे .

सुभेदार मल्हारराव होळकरआणि अहिल्याबाईंनंतर होळकरांच्या घराण्यातील पराक्रमी पुरुष म्हणून पहिल्या यशवंतराव होळकरांचे नाव घेतले जाते. होळकरघराण्याचा आणि चांदवडचा मल्हाररावांपासून संबंध येतो.मल्हाररावांना चांदवडची जहागिरी मिळाली होती.त्यांच्या खानदेशाच्या जहागिरीचा कारभार पाहण्यासाठी चांदवड हे मोक्याचे ठिकाण असल्याने त्याचे महत्व ओळखून मल्हाररावांनी चांदवडची देशमुखीही विकत घेतली. मल्हाररावांनंतर अहिल्याबाई यांनी कारभार पहिला होता. त्यांचाही वर्षातून काही दिवस चांदवडला मुक्काम असे. त्यांच्यानंतर तुकोजी होळकरांच्या काळातही धोडपचे युद्ध चांदवडच्या परिसरातच लढले गेले. तुकोजी होळकरांनंतर यशवंतराव होळकर यांचा दक्षिण स्वारीच्या निमित्ताने चांदवडशी संबंध आला. दुसरे बाजीराव पेशवे व दौलतराव शिंदे यांनी होळकरांवर जो अन्याय केला त्या अन्यायामुळे यशवंतरावाची दक्षिण स्वारी झाली. या स्वारीचे नियोजन यशवंतरावांनी चांदवड येथून केले होते. या स्वारीच्या वेळी यशवंतरावांचामुक्काम अनेक वेळा चांदवडला होता. या स्वारीच्या दरम्यानच्या यशवंतरावांच्या हालचाली या चांदवड परिसरातून होत होत्या.

तुकोजी होळकरांना काशीराव व मल्हारराव हे औरस व विठोजी व यशवंतराव हे अनौरस पुत्र(दासीपुत्र) होते.काशीराव हा जन्मत: व्यंग होता.मल्हारराव हा दुर्गुणी होता. परंतू काशीराव शारीरिकदृष्ट्या अपंग असल्याने सरदारकी आपणास मिळावी अशी मल्हाररावाची भूमिका असल्याने त्याने सतत बंडाळया करुन अहिल्याबाई व तुकोजी दोघांनाही सतावून सोडले होते.[१]मल्हाररावाचा हा स्वभाव लक्षात घेवून तुकोजी होळकरांनी त्यांच्या हयातीतच काशीरावाच्या हाती सत्ता देवून त्यास सरदारकीची वस्त्रेही पेशवे दरबारातून मिळवून दिली होती.काशीरावाला पेशव्यांकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर तुकोजीरावांच्या इतर तिन्ही मुलांकडून त्याचा विरोध वाढू लागला. यशवंतराव नागपूरला पोहचताच शिंदे आणि पेशव्यांच्या दबावामुळे तेथील शासक भोसले यांनी त्यांना कैद केले.[२]सहा महिने बंदीवासात काढल्यानंतर यशवंतराव नागपुरहून पळाले आणि नर्मदा नदीच्या जंगली भागात सैन्य गोळा करत भटकत राहिलेतेव्हा यशवंतरावांची ओळख भवानी शंकर यांच्याशी झाली.[३]दोघांनी मिळून छोटीशी सेना स्थापन केली, आणि पेशव्यांच्या क्षेत्राला लूटत त्यांनी आपले सैन्य वाढविले.शिंद्यांची बाजू घेवून दुसरे बाजीराव पेशवेहोळकरांच्या विरुध्द धोरणे राबवित होते.२९ ऑक्टोबर १८०१ रोजी त्यांनी होळकरांच्या सरंजामावर जप्ती बसविली होती.

आपल्या शत्रूशी बदला घेण आणि आपल्या भावाच्या परिवाराला मुक्त करणे हा यशवंतरावांचा मुख्य उद्देश होता. ते बडवानीच्या मार्गाने धारला पोहचले. धारचे शासक आनंदराव पवार यांनी त्यांना मदत केली. परंतू ही गोष्ट जेव्हा पेशवा आणि शिंद्यांना समजली तेव्हा त्यांनी पवारांबरोबर बोलणी करून त्यांना राज्याबाहेर काढण्यास

सांगितले. नाईलाजाने यशवंतरावांना धार सोडावे लागले. जातांना पवारांनी त्यांना काही पैसे, १४ घोडे आणि १२० पायदळ सैनिक दिले. अशा छोट्या मोठया मदतीच्या जोरावर त्यांनी आपली सेना तयार केली. त्यात त्यांनी भिल्ल, पेंढारी, अफगाणी व राजपूत यांना भरती केले. हे सैन्य घेवून यशवंतराव देपाळपूरला पोहचले.या ठिकाणी यशवंतरावांनी अल्पायू खंडेरावाला (जो शिंद्यांच्या कैदेत होता) काशिरावाच्या जागेवर होळकर राज्याचा उत्तराधिकारी बनविण्याचे सांगितले, व स्वतःला त्याचा संरक्षक म्हणून घोषित केले. खंडेरावाच्या नावाचे नाणी पाडण्यासही त्यांनी सुरुवात केली.[४] ते दिढ वर्षांनी खानदेशात येवून पोहचले. तेथे झुंजार नाईक यांनी त्यांना मदत केली.यशवंतराव होळकर यांनी इ.स. १७९९ च्या अखेरीस मध्ये माळव्यात आपले स्थान मजबूत करुन माळव्यातील शिंद्यांच्या प्रदेशावर हल्ले चढविले होते. त्याच काळात दौलतराव शिंदे व शिंदे स्त्रिया यांच्यात संघर्ष निर्माण झाला होता.

महादजी शिंदे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या गादीवर दौलतराव शिंदे आले. महादजी शिंदे यांच्या पत्न्या (भागीरथीबाई, यमुनाबाई व लक्ष्मीबाई) आणि दौलतराव यांचे जमत नव्हते. या शिंदे बायांनी पैसा अडकासुध्दा जमविला होता. महादजीच्या काळात पुढे आलेले शेणवी सरदार या बायांच्या बाजूने होते. या बायांनी दक्षिणेत जाऊन चांगलीच दहशत बसविली होती.[५]शिंदेंच्या स्त्रियांनी मदतीसाठी यशवंतरावांशी संधान साधले होते. शिंदेंच्या स्त्रियाचांदवडमार्गे बऱ्हाणपूरला पोहचल्या होत्या. बऱ्हाणपूरला जातांना शिंदे स्त्रियांच्या सैन्याने नाशिक, खानदेश प्रदेशात लुटालुट केली होती. स्त्रियांनी माळव्यात जावून यशवंतरावांशी संधान बांधले होते. आपल्या विरोधात प्रभावी युती होणार ही बातमी दौलतरावास कळताच तो काशिराव व खंडेराव होळकर यांना घेवून पुण्याहून उत्तेकडे निघाला. या काळात मोत्याजी कानगावडे खानदेशात उपद्रव देत होता. त्याच्या बंदोबस्तासाठी यशवंतरावाने कारहिल या युरोपियन अधिकाऱ्याची नेमणूक केली. कारहिलची बटालियन शिकाऊ असून तो नव्यानेच यशवंतरावाकडे नोकरीला आला होता. तो मोठया आवेशाने खानदेशात आला परंतू कानगावडेपुढेत्याला पराभव पत्करावा लागला .[६]

दौलतरावाने खानदेशमध्ये पोहचून यशवंतरावांना कळविले की तुम्ही स्त्रियांचा पक्ष घेवू नये. तुमच्या मागणी प्रमाणे मी खंडेराव होळकर याला सन्मानपुर्वक मुक्त करतो,परंतू नंतर त्याने तो शब्द पाळला नाही. परिणामी दौलतराव व यशवंतराव संघर्ष अटळ झाला. यशवंतरावाने माळव्याकडे जाणाऱ्या सर्व वाटा अडवून दौलतरावाची खानदेशातच कोंडी केली. सुमारे सहा महिने दौलतरावाला बऱ्हाणपूरातच मुक्काम करावा लागला. मे १८०१ मध्ये शिंद्यांची फौज बऱ्हाणपूरहून धुळकोटला आली. तेव्हा स्वतः यशवंतराव पन्नास हजार सैन्यानिशी नर्मदेच्या उत्तर किनाऱ्यावर वाट रोखून होता. नर्मदेच्या किनाऱ्यावर शिंदे आणि होळकर यांच्यात अनेक लढाया झाल्या. बऱ्याच लढायांमध्ये होळकरांच्या सैन्याने शिंद्यांवर विजय मिळवून त्यांच्या फौजांचे प्रचंड नुकसानही केले होते. सत्वासच्या लढाईत मात्र शिंद्यांनी होळकरांचा दारुण पराभव केला होता. जुलै १८०१ मध्ये शिंद्यांचे सैन्य माळव्यात पोहचल्यावर ऑगस्टमध्ये बऱ्हाणपूरहून सर्जेराव घाटगे माळव्यात गेला.[७] त्यानंतर शिंदे व होळकर यांच्यात झालेल्या लढायांमुळे एकमेकांची प्रमुख शहरे इंदौर व उज्जैन होरपळून निघाली.

आपला भाऊ मल्हाररावाच्या मृत्यूनंतर विठोजी दक्षिणेत गेला व त्याने तिथे दुसरे बाजीराव पेशवेयांचा भाऊ अमृतराव याचा पक्ष घेवून आंदोलन केले. खानदेश आणि कृष्णा नदिमधील प्रदेशाच्या बाजीरावाविरोधी आंदोलनाचा विठोजी कर्ता होता.[८] दुसरे बाजीराव पेशवेयांनी बाळकृष्ण गंगाधर याला त्याचा बिमोड करण्यासाठी पाठविले. परंतू त्याला यश आले नाही तेव्हा पेशव्यांनी बाळोजी कुंजर आणि बापू गोखले यांना पाठविले. थोडयाशा संघर्षानंतर बापू गोखले विठोजीला बंदी बनवून आणण्यात यशस्वी झाला. पेशव्यांनीत्याच्याशी सामान्य कैद्यासारखा व्यवहार केला, आणि १७ एप्रिल १८०१ रोजीशनिवारवाडयापुढे हत्तीच्या पायाखाली रोजीदेऊन त्याचा वध केला.[९] त्याची पत्नीजयाबाई व मुलगाखंडेरावयांना कैद केले.[१०] यशवंतरावाच्या कानावर जेव्हा ही

बातमी पडली तेव्हाच त्यांनी या सर्वांचा बदला घेण्याचे ठरविले.यशवंतरावाला घाबरविण्यासाठी पेशव्यांनी होळकरांची संपूर्ण जहागिरी जप्त करण्याचे आदेश दिले. [११]यामुळे पेशव्यांबद्दल यशवंतरावाच्या मनातील द्वेष अधिकच वाढला.

झुंजार नाईकच्या मदतीने यशवंतरावांनी सुलतानपूर नंदुरबार हे प्रदेश लुटले. महेश्वर येंथे भिल्लांची बंडाळी सुरू होती, ही व यशवंतरावांची स्वारी, या दोन्ही गोष्टी काशीरावाच्या कानावर एकदाच आल्या. तेव्हा नागो जीवाजी बरोबर शिलेदारांचे चार पाचशे स्वार, पागा, व फुलनसाहेब निसबत दुदरनेक यांचे पलटन यासह माळव्यात बंदोबस्ता करीता पुण्याहून रवानगी झाली. पुण्याहून वरती येत असता चांदवडच्या मुक्कामी नागोजीच्या माणसांची आणि गोडबोले निसबत पेशवे यांच्या माणसांची लढाई झाली. त्यात धोंडोपंत गोडबोले यांचा पराभव झाला.[१२]नागो जीवाजी इंदौरला पोहचले तेव्हा यशवंतराव कसरावदेस आहेत असे समजले. तेव्हा नागोजी कसरावदेस चालून गेले. यशवंतरावांनी कसरावद मुक्कामी कवायती पलटणीशी लढाई करून युध्द जिंकले. दक्षिणेॅकडील होळकरांचा मुलूख चांदवड, अंबाड, सुलतानपूर, नंदुरबार, शेवगाव वगैरे जे परगणे होते त्यापैकी शिंद्यांनी सुभेदार काशिरावास दिलेल्या कर्जाबद्दल आपल्याकडेच लावून घेतले होते. आणि काही उरले सुरले असतील तर ते श्रीमंतांच्या जप्तीमुळे नाहिशे झाले होते.

जानेवारी १८०२ मध्ये यशवंतरावांनी हा सर्व प्रदेश सोडविण्यासाठी दिवाण पराशरदादा यांच्याबरोबर फत्तेसिंग माने, अचेसिंग व वाजदअली खान यांना रवाना केले. पाराशरदादाजी खानदेशात जिवाजी यशवंत यांच्या कडे गेले. शिंदे बायांच्या वतीने जे कोणी शेणवी सरदार दक्षिणेत आणि उत्तरेत दौलतरावांविरुध्द उठले त्यात जिवाजी यशवंत हा एक फौजबंद सरदार होता. याच्याकडॆ शिंद्यांच्या बावन पाग्या होत्या म्हणून त्यास "बावनपागे" असे म्हणत. हे बावनपागे आणि पाराजीपंत एकत्र आले.[१३]कसरावद येथे घनघोर लढाई झाली. काशीरावाच्या पक्षाचा पराभव होवून सैन्याचीदाणादाण झाली.[१४] त्यांच्या तोफा यशवंतरावांच्या हाती आल्या. ही लढाई जिंकल्यावर यशवंतराव महेश्वरला गेले. तेथून ते सत्वासला गेले. तेथे त्यांना सात तोफा मिळाल्या.[१५] यशवंतराव होळकरांनी कसरावदच्या लढाईत काशीरावाच्या सैन्याचा पराभव केला व त्याचे परिणाममोठे झाले. महेश्वरचा कारभार पाहणाऱ्या भारमल दादांचा यशवंतरावांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला काशीरावांचा कमकुवतपणा स्पष्ट झाला. पुण्याहून आलेले सैन्य यशवंतरावांच्या विरुध्द न राहता त्यांच्या सैन्यात सामील झाले.त्यांचा मुक्काम नावडातोडीला असतांना हरकूबाई त्यांना घ्यायला गेल्या, आणि महेश्वरला घेवून आल्या. महेश्वरच्या किल्ल्यावर याप्रमाणे आसन स्थीर झाल्यावर शुभमुहूर्त पाहून यशवंतराव गादीवर बसले व त्यांनी कारभार हाती घेतला.[१६] अशा प्रकारे यशवंतरावांनी स्वकर्तुत्वावर सत्ता मिळविली.

पाराजीपंतांच्या शिफारसीने जिवाजी यशवंत यांना सरदारकीची वस्त्रे व निशाण होळकरांनी पाठविले. दोन्ही सरदार एक झाले. त्यांनी कामाची विभागणी करून घेतली. बावनपागे यांनी बऱ्हाणपुरच्या दिशेने शिंदे यांच्या फौजेच्या दिशेने जावे. पाराजीपंतांनी चांदवड परगण्याकडे वळावे असे ठरले.[१७] पाराजी पंतांनी होळकरांच्या राज्यात शिंद्यांनी ज्या ज्या ठिकाणी ठाणी बसविली होती, ती उठविली व तेथे आपली सत्ता प्रस्थापितकेली. त्यावेळी पंतांजवळ दहा हजार फौज आणि पाच पलटने होती. अनेक ठाणी उठवत व खंडण्या घेत ते राहूरी वांगूरीस आले. त्यांनी येवल्या मधूनही खंडनी वसूल केली. होळकरांचा सर्व सरंजाम मिळवून दिला. पाराजीपंतांचा हा पराक्रम पेशव्यांना कळल्यावर त्यांनी खानदेशचे सुभेदार धोंडोपंत गोडबोले यांना पारजीपंतांविरुध्द चालून जाण्यास सांगितले. त्याच प्रमाणे काळोजी कुंजर हुजरात, पागे, पथके यांना गोडबोल्यांना येवून मिळण्याचे आदेश दिले. यांची लढाई चांदवड जवळ झाली.[१८] यात गोडबोले यांचा पुर्ण पराभव झालावते कोपरगावास पळूनगेले. विंचूरकर यांच्या लोकांनी जीव मुठीत धरून स्वत:चा बचाव केला. चौदा तोफा व हजार घोडॆ यांचा पाडाव झाला. बाकीचा प्रदेश

लुटला गेला. यावेळी होळकरांच्या फौजेला आदेश देण्यात आले की "सरकारच्या तोफा वगैरे घेतल्या असतील तर त्या परत देणे."[१९] असा हुकूम देणे, म्हणजे यशवंतरावांच्या शीलतेचे ते एक उत्तम उदाहरण होते.

या मोहिमेमध्ये यशवंतरावांबरोबर अमिर खान, फत्तेसिंग माने व शहामत खान होते. सैन्यात ४१ हजार घोडेस्वार व १३ हजार पायदळ आणि ३६ तोफा होत्या. त्यांच्याकडील पायदळ सेनेचे नेतृत्व हार्डींग्ज, आर्मस्ट्रांग आणि विकर्स सारख्या युरोपियन अधिकाऱ्यांच्या हाती होते. यशवंतरावांनी पुण्याला दोन्ही बाजूंनी आक्रमण करण्याचे ठरविले. यानुसार शहामतखाने जुन्नरच्या दिशेने शिंद्यांच्या सैन्यावर आक्रमण केले. तर फत्तेसिंग माने बारामती आणि जेजूरी च्या देशेने गेले.[२०] सुरुवातीला यशवंतरावाच्या सैन्याचा विजय झाला, परंतू शिंद्यांच्या तोफां पुढे शहामत खानाच्या तोफांचा टिकाव लागला नाही, व त्यात त्यांना पराभव पत्करावा लागला. परंतू बारमतीच्या युध्दात यशवंतरावाचा विजय झाला. होळकर व शिंदे यांच्यात सामंजस्य व्हाव असे मराठा मंडळातील काही हितचिंतकांना वाटत होते. यशवंतरावांनी शिंदे यांच्याकडे तीन मागण्या केल्या होत्या.

१) खंडेरावाला शिंद्यांच्या कैदे मधून मुक्त करावे.

२) शिंद्यांनी हस्तगत केलेला होळकरांचा प्रदेश व किल्ले परत करावे.

३) शिंदे यांनी काशीरावाला कोणत्याही प्रकारची मदत करु नये आणि खंडेरावाला होळकर राज्याचा उत्तराधिकारी घोषित कराव.

ह्या मागण्या घेवून यशवंतरावांनी पाराजीपंतांना पेशव्यांकडे पाठविले. परंतू पेशव्यांनी त्यांच्याकडे लक्ष दिले नाही. उलट होळकर व शिंदे या सरदारांमधील मतभेद, वैमनस्यता दूर करण्याचे प्रयत्न केले नाहीतहे मराठेशाहीच्या उत्तरकालखंडातील ऱ्हासाचे कारण ठरत गेल्याचे दिसून येत आहे.

दिनांक१०ऑगस्ट १८०२ रोजी होळकरांचे सैन्य चांदवड, अहमदनगर, जांब या ठिकाणी जमा झालेले होते. दिनांक १४ ऑगस्ट १८०२ रोजी यशवंतराव हे चांदवडपर्यंत आले.[२१] त्यांनी मिरखा पठान आणि लक्ष्मण अनंतच्या मुलाला गोदावरी नदिच्या दक्षिणेकडे पाठविले. २२ ऑगस्ट १८०२ रोजी चांदवड हस्तगत झालेअसे यशवंतरावांनी भारमल होळकरास कळविले आहे.२५ सप्टेबर १८०२ रोजी यशवंतराव नांदपूरला होते तेथून ते चांदवडला जाणार होते.[२२] शिंद्यांचे सैन्य आपला मुकाबला करण्यासाठी अहमदनगरच्या दिशेने येत आहे अशी बातमी जेव्हा यशवंतरावांना कळाली तेव्हा ते लागलीच कूच करून नांदपूरहून चांदवडला आले. चांदवडमधून त्यांनी आपल्या अनेक सरदारांना पत्र लिहीले, आणि राहूरीच्या पुर्व दिशेने दहा कोसाच्या अंतरावर सैन्यानीशी तयार रहायला सांगितले.[२३] स्वत: यशवंतराव दोन तीन दिवसात पुण्याला पोहचणार होते. यशवंतरावांच्या सहकाऱ्यांनी संपुर्ण खानदेश लुटून नाशिकपर्यंतच्या प्रदेशात भयंकर दहशद बसविली होती.इ.स. १८०२ मध्ये यशवंतरावाने पारोळ्यातून दोन लाख खंडणी उकळली. नंतर एरंडोल येथे आठ दिवस मुक्काम करुन तेथेही प्रचंड नासाडी केली. स्वत: यशवंतरावाने धोडप, चांदवड, मालेगाव या भागात खंडणी वसूल करुन चांदवडच्या आसपास मुक्काम केला होता. सप्टेबरमध्ये यशवंतरावांनी वैजापुरीहून गाळणा व चांदवड हे किल्ले मिळविले व ते नाशिकला गेले.

होळकरांच्या स्वारीमुळे खानदेश, नाशिक, अहमदनगर या विशेषत: खानदेश या प्रांताचे खूप नुकसान झाले. यशवंतरावाने पेशव्यांकडे बाळोजी कुंजर, दाजीबा देशमुख व बाबुराव आंग्रे यांना बोलणीसाठी बोलविले. या लोकांनी यशवंतरावाकडे जाण्यास नकार दिला. योग्य निर्णय घेण्यास पेशवे असमर्थ ठरले व पेशव्यांनीयुध्दचा मार्ग अवलंबिला. २५ ऑक्टोबर १८०२ रोजी नरक चर्तुदशीच्या दिवशी युध्दाला सुरवात झाली. पेशव्यांच्या बाजूने होळकरांवर तोफांचा मारा सुरु झाला. त्यानंतर मात्र होळकरांचा तोफखाना धडाडू लागला. सुमारे आठहजार तोफगोळे या लढाईत उडविण्यात आले. भर दिवाळीच्या सणाच्या दिवशी तोफा बंदूकांची अतशबाजी, धुळीचे लोट आणि जखमी माणसांच्या किंचाळ्या अशी न भूतो न भविष्यती दिवाळी मराठ्यांच्या राजधानीत साजरी झाली.

यशवंतरावाने हडपसरच्या लढाईत शिंदे व होळकर यांचा दारुण पराभव केला. दुसरे बाजीराव पेशवा पुणे सोडून निघून गेले.[२४]

यशवंतराव पुण्यात आले तेव्हा त्यांना पेशव्यांनी पुणे सोडू नयेअसे वाटत होतेपरंतू पेशवे इंग्रजांच्या आश्रयाखाली गेले. यशवंतरावांनी पेशव्यांना बोलविण्याचा खूप प्रयत्न केला, परंतू इंग्रजांच्या मदतीने यशवंतरावाचा आपल्याला बिमोड करता येवू शकतो, असे त्यांनावाटले. विनंती करुनही पेशवे न आल्याने यशवंतरावांनी त्यांचा भाऊ अमृतराव याला ३ नोव्हेंबर १८०३ रोजी पेशवे पदावर बसविले. २३ नोव्हेंबरला यशवंतराव आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा सन्मान केला गेला. यावेळी भवानी शंकर याला नोबत, निशाण, हत्ती, घोडे, पालखी देवून राज्याचा कारभार सोपवून "राजे" चा किताब दिला गेला. शहामतखान व नजीब खान यांना नबाबचा किताब, नोबत व निशाण देवून सन्मान केला गेला. ग्रा शुभ प्रसंगी पेशवा अमृतरावाने यशवंतरावांना हाथी कंठी, शिरपेच, मोत्याचा तुर्रा व उत्तरीय वस्त्र देवून सन्मानित केले.[२५]यावेळी पेशव्यांच्या दरबारी इंग्रजांचा वकिल कर्नल क्लोज होता. इंग्रजांना जेव्हा हे माहित झाले तेव्हा त्यांनी कर्नल क्लोजला परत बोलावून घेतले.३ जून १८०३ रोजी यशवंतरावांनी आपला सैन्याचा ताफा आणि सामान चांदवडला ठेवला होता. २० जून १८०३ रोजी यशवंतरावांचा मुक्काम पुण्याला होता. त्यानंतर ते चांदवडहून दहा पंधरा कोस नंदुरबार, सुलतानपूर इकडे होते तेथून त्यांचे ३० ते ३५ हजार सैन्य हरनाथ याच्या नेतृत्वा खाली गायकवाड्च्या मदतीसाठी पाठविले जाणार होते. हे सैन्य सुरत मार्गे गुजरातला जाणार होते. यशवंतरावांनी औरंगाबादमधुन १२ लाख रुपये खंडणी गोळा केली आणि ते परत चांदवडला गेले. त्यांचा एक सरदार असबसिंह याने धोडप किल्ल्याचा ताबा घेतला होता.[२६]

**इंग्रजांशी लढाई व राजापूर घाटचातह :** हा तह इंग्रजांशी झालेला असून तो मराठयांच्या इतिहासात काळा दिवस मानला जातो. कारण ह्या तहाने दुसऱ्या बाजीरावाने तैनाती फौजेचा स्विकार केला. ३१ डिसेंबर १८०२ रोजी पेशवा बाजीरावाने यशवंतरावाच्या भीतीने वसईच्यातहावर सही केली.नंतर १३ मे १८०३ रोजी इंग्रजांनी पेशवा दुसरा बाजीराव याला पुन्हा पेशवेपदावर बसविले.[२७] या तहानंतर पेशवा इंग्रजांच्या हाताचे बाहुले बनला. इ.स. १८०३ मध्येच वेलस्ली हा दक्षिणेतून पुण्याकडे निघाला असे यशवंतरावांना समजल्यावर यशवंतराव पुणे सोडून निघाले. त्यांनी औरंगाबादला वेढा घालून ११ लक्ष खंडणी गोळा केली. पुढे पैठण व जालनापूर मधूनही खंडणी घेवून त्यांनी चांदवडला मुक्काम केला होता.[२८]औरंगाबाद मध्ये खंडणी वसूल केल्यानंतर ते जयपूरकडे वळले त्यावेळी जयपूरच्या राजाचा इंग्रजांशी तह झाला होता. त्यामुळे तेथील वसूली ही इंग्रजांसाठी एक प्रकारचे आव्हान होते. यशवंतरावाच्या कारवायांना पाहून लॉर्ड लेक याने त्यांना एक पत्र पाठविले त्यात त्याने लिहीले होतेकी इंग्रजांच्या मैत्री राज्यांवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण सहन केले जाणार नाही. आपल्या सैनिकी कारवाया सोडून आपला वकिल बोलणीसाठी आमच्याकडे पाठवावा असे सांगितले. लॉर्ड लेक यशवंतरावांच्या कारवायानी एवढा त्रस्त झाला होता की त्याने गव्हर्नर जनरलला पत्र लिहीले, आणि त्यात सांगितले की, यशवंतरावांच्या शक्तीला जर आता आळा नाही घातला तर ते आपल्यासाठी घातक असेल. समझोता करण्याचे सर्व प्रयत्न असफल झाल्या नंतर लोर्ड वेलेस्लीने इ.स.१६ एप्रिल १८०४ रोजी यशवंतरावां विरुध्द युध्द पुकारले. हे युध्द डिसेंबर १८०५ पर्यंत चालले.[२९] एप्रिल १८०४ मध्ये स्वत: अफगाणिस्तानच्या बादशहाने यशवंतरावांना पत्र, वजिरी शिक्का, आणि पोषाख पाठविला आणि एक लाख सैन्यासोबत होळकरांच्या मदतीला तयार असल्याचे सांगितले. १ जून १८०४ रोजी जिवलक सिंह हा होळकरांचा सरदार आपल्या अन्य साथीदारांच्या मदतीने चांदवडमध्ये लुटालुट करीत होता.[३०] काशिराव होळकर तेव्हा दोन हजार सैन्यानिशी थाळनेरच्या जवळ होता. जिवलक सिंह याने त्याच्यावर हल्ला केला आणि काशीरावाला अटक केली.३१ त्यावेळी यशवंतरावांचा मुक्काम जयपूर आणि सांबरच्या मध्ये होता. यशवंतरावांनी जयपूरमधुन २५ लाख रुपयांची खंडणी वसूल केली.

युध्दाचे चौथे केंद्र दक्षिणेत चांदवड लासलगाव इ. ठिकाणी असल्यामुळे दक्षिणेकडे पाहण्यास त्यांना तितका अवसर मिळाला नाही. त्यांची फौजही बेताचीच होती. दुसऱ्या बाजूने पेशवे आणि त्यांचे सरदारांचे सामर्थ एकवटलेले होते. त्यामुळे यशवंतरावांची चांदवड, धोडप आणि जालना ही ठिकाणे हातातून निसटली ब्यावेळी चांदवड इंग्रजांच्या ताब्यात गेले. युध्दाच्या सहा केंद्रापैकी उत्तरेकडील मध्य हिंदुस्तान, दुआब आणि जाटांचा प्रांत यात यशवंतरावांनी इंग्रजांना चांगलेच दमविले होते. तर उरलेल्या तीन प्रांतात म्हणजेच बुंदेलखंड दक्षिण आणि माळव्यातील जयापजय सारखाच झाला. कंपनी सरकारचा विचार समेट घडवून आणणे हेच योग्य आहे असे ठरले. जनरल लेककडे असा हुकूम गेला की होळकरांची समजूत घालून कसेतरी हे युध्द संपवावे. २४ डिसेंबर १८०५ रोजी हा तह ठरला. या तहाला राजापूर घाट्चा तह असे म्हणतात.

या तहाने होळकरांचा पुर्वीचा प्रदेश कायम झाला. अणि विशेष म्हणजे चार पाच वर्षाच्या हाल अपेष्टेनंतर यशवंतराव होळकर जगाच्या दृष्टीने होळाशाहीचे खरे मालक ठरले. पेशव्यांचा अधिकार बाजूला पडला. मल्हारराव यांचा मुलगा खंडेराव हा किशनगडावरून येत असतांना त्याचा मृत्यू झाला.२४ डिसेंबर १८०६ रोजी इंग्रज आणि यशवंतराव यांचा समेट घडून आला. हा तह कंपनी सरकारकडून कर्नल माल्कम तर यशवंतरावांकडून शेख हबिबुल्ला व बाळाराम शेठ यांच्यात झाला. यात दोघांनीही एकमेकांवर आक्रमण करू नयेअसे ठरले. होळकरांचा प्रदेश त्यांना परत मिळाला. माळवा, मेवाड, हवेली ही राज्येही यशवंतरावांच्या हवाली केलीत. याशिवाय दक्षिणेकडील त्यांची ठिकाणे त्यांना परत मिळाली. चांदवडचा किल्ला व परगणा अंबड, शेवगाव ही गावे गोदावरीच्या उत्तरभागी आहेत ती होळकर सरकारच्या कराराप्रमाणे तारीख मजकूर पासून अठरावे महिन्यांनी होळकरांच्या हवाली करावी असे ठरले.[३२] या तहाने महाराजांची 'चिरा चिऱ्याच्या जागी बसवा" ही इच्छा कंपनी सरकारकडून पुर्ण झाली.

भिल्ल, पेंढारी यांच्याशी मराठा सरदार यांच्या सातत्याने लढाया व चकमकी सुरु होत्या. चांदवड, चाळीसगाव, धरणगाव, अंतूरपाळे, चोपडा, नशिराबाद या परगण्यांमध्ये भिल्लांचा खूपच जोर वाढला होता.[३३] मधुन मधुन अली बंगश, दादू खान वगैर यशवंतरावांवर उलटून पडण्याचे प्रसंग या दोन तीन वर्षात घडले. ही मंडळी इ.स.१८०८ च्या मे महिन्याच्या सुमारास चांदवड सभोवताली जमली होती. यावेळी चांदवडचे कारभारी खंडोपंत हे होते. प्रसंगाची तत्परता पाहून जवळपास असलेल्या कंपनीच्या अधिकाऱ्याकडे त्यांनी मदत मागितली. त्या अधिकाऱ्याने मोठया सहानुभूती पुर्वक इंग्रजांकडे बोट दाखविले. अशा स्थितीत दादूखान आणि त्यांचे सहकारी यांनी या भागात खानदेशात कित्येक महिन्यापर्यंत नासधूस चालविली. ही बातमी यशवंतरावांना कळताच त्यांनी मीरखानचा बंदोबस्त केला. नंतर बरेच महिने त्याने याभागाकडे बघितलेही नाही.

इंग्रजा सारख्या बलाढयशत्रूशी लढतांनातोफखाना हेच आपल्या बचावाचे साधन म्हणून भानपुरा येथे स्वतःचा तोफखाना उभारला.[३४]फेब्रुवारी १८०९ मध्ये यशवंतरावांची कन्या भिमाबाई यांचा विवाह गोविंदराव बुळे यांच्याबरोबर मोठया थाटा-माटात झाला. ४ डिसेंबर १८०९ रोजी यशवंतरावांनी भिमाबाई बुळे यांना खाजगी खर्चासाठी सरकारातून चांदवड परगणे मजकूर येथील मौजे देवगाव, राई, महालाखेरीज तीन गावे साल मजकूरा पासून अंमल दरोबस्त दुमाला करून वहिवाट बिनदिक्कद चालविण्यास दिली होती[३५]. २७ ऑक्टोबर १८११ रोजी यशवंतरावाचा मृत्यू झाला.[३६]यशवंतरावांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी तुळसाबाई यांनी यशवंतरावांचा पुत्र मल्हारराव दुसरायांची संरक्षिका म्हणून सत्ता सांभाळली.

चांदवड हे होळकरांच्या उपराजधानीचे ठिकाण होते. दक्षिण स्वारीच्या वेळी अनेकदायशवंतरावांचा मुक्काम हा चांदवडला होता. त्यांनी या भागातील स्वारीचे नियोजनहीचांदवडमधून केलेले दिसते. यशवंतराव होळकरांना सामान्य आणि गरिब, दलित वर्गाचे सहकार्य लाभले आणि त्यांनी विशाल जनशक्ती उभारली व स्वतःचा तोफखाना देखील निर्माण केला. सामान्य माणसात यशवंतरावांनी आपलेपणाची जाण निर्माण करुन इंग्रजांविरुध्द थोड्याच कालावधीत मोठया प्रमाणात सैन्य उभारले.पहिल्या तुकोजीरावांनंतरच्या अस्थिर काळात यशवंतरावांच्या

चारही बाजूंनी स्वकिय व परकिय शत्रू होते.होळकरांच्या राज्यावरही हक्क नव्हता तरीसुध्दाहोळकर राज्य बुडत असतांना या राज्याची धुरा त्यांनी मोठया साहसाने सांभाळली.

**प्रकरण २ –**

**संदर्भ आणि टिपा:**


१)खडपेकर विनया, ज्ञात-अज्ञात अहिल्याबाई होळकर, राजहंस प्रकाशन, पुणे, २००८., पृ. ३५८.

२)फाटक न.र., यशवंतराव होळकर, श्री क्षत्रिय सेवा संघ, इंदूर, १९६७. पृ. १५.

३) लुअर्ड सी., *इंदौर स्टेट गॅझेटियर*, भाग-२, इंदौर, १९२०, पृ. २१.

४) फाटक न. र., पूर्वोक्त, पृ. २३, ३१

५) ठाकूर वा.वा., होळकरशाहीचा इतिहास, भाग-२, होळकरगव्हर्नमेंट प्रेस, इंदूर, १९४६. पृ. ३३.

६) भागवत अ. ना. (संपादक), होळकरशाही इतिहासाची साधने, खंड –५ होळकरगव्हर्नमेंट प्रेस, इंदूर, १९४४., पृ. ५३.

७) होळकरशाहीचा इतिहास, भाग २, पूर्वोक्त,पृ.३६ ते ३९.

८) कित्ता, पृ. १३.

९) कित्ता, पृ. १४.

१०) कित्ता.

११)सरदेसाई गो. स.सिलेक्शन फ्रॉम पेशवा दप्तर खंड-४१, गव्हर्नमेंट प्रेस मुंबई, १९३०.पृ.३०.

१२) होळकरांची कैफीयत, पृ. १२८ ते १३९.

१३) होळकरशाहीचा इतिहास भाग-२, पूर्वोक्त पृ. ३६ - ३७.

१४) भागवत अ. ना. (संपादक), खंड-५, पृ. ५३.

१५) होळकरशाहीचा इतिहास, पूर्वोक्त भाग-२, पृ. ३६ - ३७.

१६) कित्ता, पृ. ३८ - ३९.

१७) कित्ता, पृ. ५२.

१८) ऐतिहासिक लेख संग्रह, भाग-१३,भारत इतिहास संशोहन मंडळ, पुणे.पृ. ६९२७.

१९) होळकरशाहीचा इतिहास, पूर्वोक्त ,भाग-२, पृ. ५३.

२०) कित्ता, पृ. ६४ - ६५.

२१)ऐतिहासिक लेख संग्रह, भाग-१३, लेख ६४११.

२२) होळकरशाहीचा इतिहास भाग-२, पृ. ६६.

२३) ऐतिहासिक लेख संग्रह, भाग-१३, लेख ६४२३.

२४) होळकरशाहीचा इतिहास, भाग-२, पृ. ७६.

२५)होळकरांची कैफीयत, पृ. ९४ - ९५.

२६) ऐतिहासिक लेख संग्रह, भाग-१४, लेख ६४७५.

२७)भागवत अ. ना. (संपादक), खंड-५, पृ. ९४.

२८) होळकरशाहीचा इतिहास भाग-२, पृ. १००.

२९) कित्ता, पृ. १०३.

३०) कित्ता, पृ. १११.

३१)ऐतिहासिक लेख संग्रह, भाग-१३  भाग-१५, लेख ६८६४.

३२) कित्ता.

३३) होळकरशाहीचा इतिहास, भाग-२, पूर्वोक्त पृ. १२३ - १२४.

३४)होळकरांची कैफीयत, पृ. १७४.

३५) होळकरशाहीचा इतिहास, भाग-२, पूर्वोक्त पृ. १५१
३६) होळकरांची कैफीयत,पृ.१८२.